ठाणे जिल्हयातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. वेतन १२१५/प्र.क्र. ४३०/१५/टीएनटी-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०४ एप्रिल, २०१८

<u>संदर्भ :-</u>

१ शालेय शिक्षण शासन निर्णय क्र. एसएसएन -१८६७/७६१४२-जी, दिनांक २९ मे १९७३
२ शासन निर्णय वित्त विभाग क्र. डी.डी.ओ.-१००५/प्र.क्र.५/कोषा-प्रशा-५, दिनांक २९ ऑगस्ट, २००५
३ शासन निर्णय वित्त विभाग क्र.डी.डी.ओ. १००५/प्र.क्र.६२/कोषा-प्रशा-५, दिनांक ७ एप्रिल, २००८
४ शासन निर्णय , शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/१२/माशि-२, दिनांक ३ ऑगस्ट, २०१२
५ शासन शुध्दीपत्रक , शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/०७/माशि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२
६ शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/०७/माशि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२
७ शासनाचा समक्रमांक दिनांक १४ जुन, २०१७ रोजीचा शासन निर्णय
८ शासनाचे समक्रमांक दिनांक ३० जुन, २०१७ रोजीचे शुध्दीपत्रक

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित - विना अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान टी.जे.एस.बी. (TJSB) सहकारी बँकेमार्फत करण्याबाबत दिनांक १४ जुन, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सदर शासन निर्णयाविरोधात रिट याचिका क्र.८१३६/२०१७ व ८१३९/२०१७ दाखल झाल्या होत्या. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २१.२.२०१८ रोजी अंतिम निर्णय दिला असून शासनाचा दिनांक १४.६.२०१७ रोजीचा शासन निर्णय रद्द केला आहे. मा. उच्च न्यायालयाने आदेशात खालील प्रमाणे नमुद केले आहे-

"However, we may note that in the similar matter, which we have diceded on 9th February 2018, the learned Advocate Gerneral had submitted that, there was total freedom to the employees and the schools to open their accounts in whichever bank they disired. Learned Advocate General fairly submitted that, though the communication dated 21.06.2017 addressed by Respondent No.5 (in the said Petition) compels the headmaster of the schools and the teachers to open the account in Respondent No.7 bank (in the said Petition), the same is not being implemented. He further stated that even as of now the salaries are being paid to the teachers in their account in the bank of their choice. We find that, even after the impugned Government Resolution is quashed and set aside, no change is required to be done in that system. The only change would be the "Pool account", which is being operated by TJSB, would be operated by TDCC." त्यामुळे सदर शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ठाणे जिल्हयातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत अदा करण्याबाबतचा निर्णय रद्द करुन दिनांक १४ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेऐवजी टी.जे.एस.बी. (TJSB) सहकारी बँकेमार्फत अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.८१३६/२०१७ व रिट याचिका क्र.८१३९/२०१७ मध्ये दिनांक २१.२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक १४ जून, २०१७ चा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे.

२. त्यानुसार अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक /माध्यमिक) यांचे मेन पुल अकाउंट (पार्किंग अकाउंट) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत तात्काळ उघडण्यात यावे.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक २१.२.२०१८ च्या आदेशानुसार संबंधीत शाळा व शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांचे वैयक्तिक खाते अन्य बँकेत उघडण्याचे स्वातंत्र्य राहील.

४. सदर निर्णयामुळे टी.जे.एस.बी. सहकारी बँकेसोबत करण्यात आलेला करारनामा संपुष्टात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४१८०२४५४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b952353 7dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.04.04 18:05:56 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव
२ आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
५ संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६ सह संचालक (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७ शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्य), महाराष्ट्र राज्य, पुणे
८ विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई
९ शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद ठाणे
१० जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
११ अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.ठाणे
१२ सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३ निवड नस्ती, टीएनटी/३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.